# MARATHI LANGUAGE I
# STANDARD XI
# PATTERN FOR FIRST TERMINAL (FIRST SEMISTER)

| Date :21-01-2016 | Sub : Marathi (Language I ) | Marks : 80 |
|---|---|---|
| Total No. of Questions : 08 | (Printed Pages :04 ) | Time : 2.30 Hours |

सूचना : १. शुद्धलेखनाचे नवीन नियम पाळावेत.
२. उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

प्र.१.अ.खालीलपैकी कोणत्याही एकाचे वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. ०५

१ . 'बापेया एसणासी फळे एर्णेचि पाविजती'

२ . "या अळूतनं वाचलो तर चार भाऊ नाहीतर तीन."

प्र.१.ब.खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर प्रत्येकी ७ ते ८ ओळींत लिहा. ०५

१. डॉ. अभय बंग व्यायामपूर्वक गृहदेवतांविषयी काय सांगतात ?

२. खेडगीकर विद्यार्थ्यांना कशी शिक्षा दयायचे ?

प्र.२.अ.खालीलपैकी कोणत्याही एकाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. ०५

१. देव आले हो बाहेरी.मज नेलें खांदयावरी..

२. कारूण्य तें कींव भाकणे. धैर्य उपजणे ते धीर..

प्र.२.ब.खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. ०५

१. कवी भा. रा. तांबे यांनी स्त्रीची महानता कोणत्या शब्दात वर्णन केली आहे ?

२.माणसाचे सामर्थ्य कवी ग.दि.माडगूळकर यांनी कसे पटवून दिले आहे ?

प्र.३.अ.खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा ०५

१.व्ही.आर.नागराज यांच्यापासून कोणती बातमी लपवून ठेवण्यात आली ?

२.'अग्नी'चे उड्डाण केव्हा झाले ?

३.दत्तू टप्पेवाला सकाळी रूबाबदार का दिसे ?

४.अन्वरशाने गावातील मुलांना कोणते बाळकडू पाजले ?

५.सहद म्हणजे काय ?

प्र.३.ब. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा ०५

१.प्रपंचातून मुक्त होण्यासाठी संत ज्ञानेश्वरांनी कोणता मार्ग सुचवला आहे ?

२.आनुभवाची प्रचिती कोण देते ?

३. 'आलो तुझ्या दर्शनासी' हा अभंग कोणी लिहिला आहे ?

४.कवी कोणाला पिसाट म्हणतो ?

५.आत्मबळाची आवश्यकता काय ?

प्र.४.अ. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३ ते ४ ओळींत लिहा. ०६

१.हॅवलॉक एलिसच्या बायकोविषयी लेखक काय सांगतात ?

२.लेखकाच्या सुस्वभावी मित्राला मृत्यूचे भय का वाटायचे ?

३.आयुष्याच्या शेवटच्या प्रवासात लेखकाला काय बरोबर न्यायचे आहे ?

४.डोंगरावरच्या बर्फाचे वर्णन लेखक कसे करतात ?

प्र.४.ब.खालीलपैकी कोणत्याही एका म्हणीचा अर्थ सांगून त्याचा वाक्यात उपयोग करा. ०२

१.जशास तसे २.घरोघरी मातीच्या चुली

प्र.४.क.खालीलपैकी कोणत्याही एका वाक्प्रचाराचा अर्थ सांगून त्याचा वाक्यात उपयोग करा. ०२

१. बारा वाजणे २. पाठ फिरविणे

प्र.५.अ.खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा. ०२

१.शेतावरून सायंकाळी शेतकरी मजूर घरी परतले की तो मग डोक्यावर चिवडयाची पेटी घेऊन गावात फेरी मारी .

प्र.५.ब.खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा. ०२

१.समाधान २.आवड

प्र.५.क.खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. ०२

१. सूर्य २.उदर

प्र.५.ड. खालील वाक्यात विरामचिन्हे घालून त्या वाक्यांचे पुनर्लेखन करा. ०२

१. काही झाडे अशी असतात की त्यांना कधी फुले येत नाहीत

२. अरे असा घाबरल्यासारखा काय दिसतोस अलीकडे तू

प्र.५.इ.खालील वाक्य शुद्ध करून लिहा. ०२

उशासी ठेवावीशी वाटतात ति सुंदर पुस्तक अशी माझी सुंदर पुस्तकांची व्याक्या आहे.

प्र.६.अ. खालील उता-याचा एक तृतीयांश सारांश लिहा. ०५

प्रसारमाध्यमे आणि सामाजिक संस्थाना तिहारमध्ये मुक्त प्रवेश देऊन डॉ. किरण बेदी यांनी एक नवाच पायंडा पाडला. आजवरची प्रथा अशी होती की केवळ तिहारच्याच नव्हे तर देशातील प्रत्येक तुरूंगाच्या त्या भल्यामोठया लोखंडी बंद दरवाज्याआड काय घडतं याबद्दल कमालीची गुप्तता बाळगण्यात येत असे. अगदी आजसुद्धा प्रसारमाध्यमे आणि सामाजिक संस्थाना तुरूंगात प्रवेश करण्यापासून शक्य तितकं परावृत्त करण्याची धडपड अनेक संस्था करत असतात. असे तुरूंग ज्या व्यक्तींना ठेवण्यासाठी बांधले आहेत त्या व्यक्तीच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणणारं वातावरण या सामाजिक संस्थामुळे तेथे निर्माण होऊ शकणारं असतं. ते तसं मुळीच होऊ नये अशा इच्छेनेच या संस्थाना लांब ठेवण्यात येते. तुरूंगाची दारे आल्या गेल्या सर्वांना खुली करावी तेथील कैद्यांना प्रयोगशाळेतील नमुन्याप्रमाणे ठेवावे... अशा मताचा तर मीही नाही. अगदी नक्कीच नाही. पण ज्या व्यक्तींच्या

अंगी काही मदतकार्य देण्याची क्षमता आहे पात्रता आहे आणि तुरूंगाच्या व्यवस्थापनाच्या खांदयाला खांदा लावून काम करण्याची कुवत आहे अशांचं तरी खुल्या दिलानं तुरूंगात स्वागत झालं पाहिजे. उगीच तुरूंगातील कैद्यांना हाल भोगायला लावण्यात् अपुरा निधी असल्याची सबब पुढे करण्यात तरी काय अर्थ आहे? आणि तेही त्या कैद्यांची आयुष्ये आर्थिक् भावनिक व बौद्धिकदृष्टया समृद्ध करणं शक्य असताना.

पान कमांक ८९

डॉ. किरण बेदी प्रस्तुत 'तुरूंगातील सावल्या'

मूळ लेखक : रूझबेह भरूचा अनुवाद : लीना सोहोनी

प्र.६.ब.खालील कविता वाचून त्याच्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. ०५

निसर्गाने दगड दिला
मी त्याची मूर्ती केली
निसार्गाने फुले दिली
मी त्याची माळ केली
दगड- माती निसर्गाची
मी त्यांचे देऊळ केले
पाणी होते निसर्गाचे
मी त्याचे तिर्थ केले
निसर्गाने वाचा दिली
मी तिचे शब्द केले
देवळामध्ये मूर्ती ठेवून
शब्दांनी त्या भजन केले
निसर्गाने दिले तरी
सारे उलट घडत गेले
हाती दगड आला त्याचे
मीच अखेर अस्त्र केले!

___ शंकर वैद्य

प्रश्न : १.निसर्गाने दिलेल्या गोष्टींचा माणसाने कसा उपयोग केला ? (०२)

२.वाचा या शब्दाचा अर्थ काय ? (०१)

३.माणसाकडून कोणती चूक घडली ? (०२)

प्र.७.अ.केसरकर उच्च मध्यमिक माध्यमिक विद्यालय पणजी आयोजित बक्षीस वितरण समारंभाचे निमंत्रणपत्र तयार करा. ०५

***अंतीम सत्रांत परीक्षेत निमंत्रणपत्राऐवजी वृत्तांतलेखनावर प्रश्न विचारावा.**

प्र.७.ब. दै. सन्मानमध्ये आलेली खालील जाहिरात वाचून आपण सचिन सालसकर \ सचिता सालसकर, 'पावन' ४३२, कोंबा-मडगाव-गोवा असे समजून खाली नमूद केलेल्या पदासाठी अर्ज करा. **05**




दै. सन्मान

२८ मार्च २०१५

पहिजे

**व्यवस्थापक**

शैक्षणीक पात्राता : कोणत्याही शाखेचा पदवीधर

वाणिज्य पदवीधरास प्राधान्य

संगणकाचे ज्ञान अत्यावश्यक

अनुभव : कमीत कमी दोन वर्षे

**संपर्क \ अर्ज करा :**

संचालक, सुधिर पॅकेजींग, ब-७७

श्रीस्थळ औद्योगिक वसाहत, श्रीस्थळ-काणकोण-गोवा.

***अंतीम सत्रांत परीक्षेत अर्जलेखनाऐवजी विनंतीपत्र.**

प्र.८.खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे पंचवीस ओळींचा निबंध लिहा. १0

१ : रस्ता सुरक्षा आणि माझी जबाबदारी. २ : एका ट्रकचे आत्मवृत्त .

३ : माझा आवडता खेळाडू. ४ : एक अविस्मरणीय दिवस.

ﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀﺀ